महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यालयमहात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था ,यवस्थापकीय संचालक
(महाज्योती)महाराष्ट्र राज्य नागपूर

पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – ४४० ०२२
दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U85300PN2019NPL187405 ई-मेल: mahajyotingp@gmail.com

जावक क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/ २८०४ /२०२३-२४ दि. २२/१२/२०२३

# -:परिपत्रक:-

**विषय:- महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) २०२३-२४ व महाराष्ट्र लोकसेवा आयोग संयुक्त गट 'ब' व 'क' (MPSC Group B & C) परीक्षा पूर्व प्रशिक्षणाअंतर्गत निवड यादीमधून दुबार म्हणून वगळलेल्या विद्यार्थ्यांकरिता सूचना.**

महाज्योतीमार्फत दि. २५ व २६ ऑक्टोबर २०२३ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) २०२३-२४ व दि. २७ व २८ ऑक्टोबर २०२३ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोग संयुक्त गट 'ब' व 'क' (MPSC Group B & C) या परीक्षा पूर्व प्रशिक्षणाअंतर्गत निवड यादी दि. ०४/१२/२०२३ रोजी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली. प्रसिध्द करण्यात आलेल्या निवड यादीमधून दुबार लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वगळण्यात आलेले होते. दुबार लाभ म्हणून वगळण्यात आलेल्या काही विद्यार्थ्यांनी त्यांचा "प्रवेश रद्द करण्यात आला होता व कोणतेही विद्यावेतन घेतलेले नाही" अशा स्वरूपाच्या तक्रारी महाज्योती कार्यालयाकडे केली होती.

विद्यार्थ्यांच्या प्राप्त तक्रारींची पडताळणी करून विद्यार्थ्यांची प्रशिक्षणाकरिता निवड करण्यात येत आहे. या परिपत्रकासोबत विद्यार्थ्यांची निवड यादी जोडण्यात येत असून विद्यार्थ्यांनी दि.३०/१२/२०२३ पर्यंत मुळ कागदपत्रांसोबत ठरवून देण्यात आलेल्या प्रशिक्षण संस्थेत रुजू व्हावे.

विहित कालावधीमध्ये जे विद्यार्थी प्रवेश निश्चित करू शकले नाही त्या विद्यार्थ्यांच्या ऐवजी प्रतिक्षा यादीमधील विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

(स्वा)
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण
संस्था, (महाज्योती), नागपूर